**ठळक बातम्या**

- पहिल्या महायोगी गुरु गोरखनाथ आयुष विद्यापीठाचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते लोकार्पण

- डिजिटल इंडिया उपक्रमामुळे देशानं सशक्तीकरणाच्या एका नव्या युगात प्रवेश केल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर प्रणालीला आज आठ वर्ष पूर्ण

- महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात कामकाजाला सुरुवात, नाना पटोले यांच्या निलंबनामुळे विरोधकांचा दिवसभराच्या कामकाजावर बहिष्कार टाकत सभात्याग

**आणि**

- व्यावसायिक वापराच्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत घट

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उत्तर प्रदेशाच्या दौऱ्यावर असून त्यांच्या हस्ते आज पहिल्या महायोगी गुरु गोरखनाथ आयुष विद्यापीठाचं गोरखपूरमध्ये लोकार्पण झालं. यावेळी राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते. यावेळी बोलताना राष्ट्रपती म्हणाल्या…

**होल्ड बाईट - राष्ट्रपती**

या विद्यापीठाची पायाभरणी २८ ऑगस्ट २०२१ ला तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी केली होती. हे विद्यापीठ ५२ एकरांवर उभं राहिलं असून त्यासाठी २६७ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मंजूर करण्यात आला होता. विद्यापीठाच्या उद्घाटनानंतर, राष्ट्रपती मुर्मू गोरखनाथ मंदिरालाही भेट देतील. त्यानंतर त्या

शैक्षणिक दालन, सभागृह आणि पंचकर्म केंद्राचं उद्घाटन करतील आणि सोनबारसा इथल्या महायोगी गोरखनाथ विद्यापीठाच्या आरोग्यधाम परिसरात मुलींच्या वसतिगृहाची पायाभरणी करतील.

<><><><>

डिजिटल इंडिया अभियानाचा दशकपूर्ती सोहळा आज देशात साजरा केला जात आहे. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करत प्रशासनात सुधारणा करणं आणि नागरिकांचं एकूण जीवन सुलभ करणं, या उद्देशानं २०१५ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हे अभियान सुरू केलं होतं. यासंदर्भात समाजमाध्यमावर जारी केलेल्या संदेशात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, एकशे चाळीस कोटी भारतीयांच्या सामूहिक संकल्पामुळे देशानं डिजिटल पेमेंट्स मध्ये मोठी झेप घेतल्याचं नमूद केलं. शहरी भागापासून ते गलवान, सियाचीन आणि लडाखसारख्या दुर्गम लष्करी भागापर्यंत हाय-स्पीड इंटरनेट पोहोचलं आहे. यूपीआयद्वारे दरवर्षी १०० अब्जाहून अधिक व्यवहार होत असून जागतिक पातळीवरच्या रिअल टाईम डिजिटल व्यवहारांपैकी जवळपास निम्मे व्यवहार आता भारतात होत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. या अभियानानं कोट्यावधी लोकांच्या जीवनात स्थान मिळवलं आणि आणि देशानं सशक्तीकरणाच्या एका नव्या युगात प्रवेश केला, असं नमूद करत, आरोग्य आणि शिक्षण, अशा क्षेत्रांनाही यामुळे मोठा लाभ झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

तर आरोग्य सेवेपासून व्यवसायापर्यंत नागरिकांना सक्षम करण्यात डिजिटल इंडिया उपक्रमाचा खूप मोठा वाटा आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डिजिटल इंडियाच्या दशकपूर्तीबद्दल दिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

वस्तू आणि सेवा कर प्रणालीला आज आठ वर्षं पूर्ण झाली. आर्थिक एकात्मता आणि कर सुधारणांच्या दिशेनं एक मोठा बदल म्हणून २०१७ मध्ये GST प्रणाली

लागू करण्यात आली. जीएसटीनं कर अनुपालन सोपं केलं असून व्यवसायांसाठी खर्च कमी केला आहे. तसंच राज्यांमध्ये वस्तूंची अखंड वाहतूक सुनिश्चित केली आहे. देशातल्या वस्तू आणि सेवा कराचे दर, जीएसटी परिषदेद्वारे निश्चित केले जातात, ज्यामध्ये केंद्र आणि राज्य तसंच केंद्रशासित प्रदेश सरकारांचे प्रतिनिधी समाविष्ट असतात.

सध्या, देशाच्या जीएसटी रचनेत ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के असे चार मुख्य थर आहेत. जीएसटीनं उत्पादन शुल्क, सेवा कर, व्हॅट आणि इतर अप्रत्यक्ष कर काढून टाकून एकच कर प्रणाली सुरू केली आहे. करदाता सेवा महासंचालनालय मुंबई विभाग, आज वस्तू आणि सेवा कर प्रणालीचा आठवा वर्धापन दिन साजरा करत आहे.

**<><><><><>**

देशभरात आज डॉक्टर आणि सनदी लेखापाल दिवस साजरा केला जात आहे. दोन महत्त्वांच्या सेवांच्या योगदानाचा सन्मान करणं हा यामागचा उद्देश आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यानिमित्तं सर्व डॉक्टर्स आणि सनदी लेखापालांचं अभिनंदन केलं आहे. भारताची आरोग्यसेवा मजबूत करण्यात डॉक्टरांचे योगदान खरोखरच असाधारण असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार मंत्र्यांची मंथन बैठक काल नवी दिल्लीत आयोजित करण्यात आली होती. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत देशातल्या सहकारी चळवळीला बळकटी देण्यासाठी सुरू असलेल्या योजनांचा आढावा घेण्यात आला. राष्ट्रीय सहकार धोरण लवकरच जाहीर केलं जाणार असून, ते २०२५ ते २०४५ पर्यंत लागू असेल, असं शहा यांनी सांगितलं.

या धोरणांतर्गत, प्रत्येक राज्याचं सहकार धोरण त्या त्या राज्याच्या परिस्थितीनुसार तयार करण्यात येईल, असं ते म्हणाले. या बैठकीत राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी राज्यातल्या सहकार क्षेत्रातल्या यशस्वी उपक्रमांचा आढावा घेतला.

**<><><><><>**

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसाच्या कामकाजाला आज प्रश्नोत्तराच्या तासानं सुरुवात झाली. अधिक व्याज देणाऱ्या किंवा लोकांची फसवणूक करणाऱ्या योजना रोखण्यासाठी पोलिसांनी कारवाई मोहीम सुरू केली आहे, अशा कंपन्यांविरुद्ध देखील कारवाई करण्यात येत आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रश्नोत्तराच्या तासांत दिली. आर्थिक गुन्हे शोधून काढून त्यांच्यावर कारवाईसाठी विशेष पथक तयार करण्यात आलं  आहे, जनतेनं देखील अशा फसव्या योजनांवर विश्वास ठेवू नये, असं ते म्हणाले.

बीड जिल्ह्यात शाळकरी मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार  प्रकरणात एका वरिष्ठ महिला अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या चेतन तुपे यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. कालबद्ध पद्धतीने हा तपास पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असं ही मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात प्रदूषण करणाऱ्या ३०४ उद्योगांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, तर ३१८ उद्योगांवर ते बंद करण्याची कारवाई करण्यात आली आहे, अशी माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

**<><><><><>**

विधानसभा अध्यक्षांच्या आसनाकडे धावून जात राजदंडाला स्पर्श केल्याप्रकरणी काँग्रेस सदस्य नाना पटोले यांना आज दिवसभरासाठी सभागृहातून

निलंबित करण्यात आलं. या निर्णयावर नाराजी व्यक्त करत विरोधकांनी दिवसभराच्या कामकाजावर बहिष्कार टाकत सभात्याग केला.

**<><><><><>**

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आज विधानभवन परिसरातल्या त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आलं. यापवेळी महाविकास आघाडीचे आमदार उपस्थित होते. दरम्यान शेतकऱ्यांवर अन्यायकारक ठरणारा शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी आज विधिमंडळाच्या पायऱ्यांवर महाविकास आघाडीच्या आमदारांनी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केलं.

**<><><><><>**

व्यावसायिक वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत घट झाली आहे. मुंबईत ५८ रुपयांनी किंमत कमी झाली असून आता ती १ हजार ६६५ रुपये झाली आहे. दरम्यान, नवी दिल्लीत व्यावसायिक एलपीजीच्या किमतीत ५८ रुपये ५० पैशांनी, कोलकातामध्ये ५७ रुपये आणि चेन्नईमध्ये ५७ रुपये ५० पैशांनी घट झाली आहे. घरगुती सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही अशी माहिती इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडनं दिली आहे.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं स्टार्टअप ॲक्सिलरेटर  उपक्रम वेव्हएक्स अंतर्गत वेव्हएक्स स्टार्टअप चॅलेंज २०२५ ची सुरूवात केली आहे. देशभरातल्या स्टार्टअप्स, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून बहुभाषिक भाषांतर प्रणाली विकसित करण्यासाठी या राष्ट्रीय हॅकेथॉनमध्ये सहभागी होऊ शकतात.

**<><><><><>**

तेलंगणातल्या संगारेड्डी जिल्ह्यात पाशमाइलाटम या औषधनिर्माण कारखान्यात काल झालेल्या स्फोटातल्या मृतांची संख्या ३५ झाली आहे. मृतांपैकी

११ जणांची ओळख पटल्याची माहिती पोलिसांनी दिली. कारखान्यातील ढिगाऱ्याखाली आणखी १६ कामगार अडकल्याची शक्यता वर्तवली जात आहे. NDRF आणि SDRF पथकं दिवसरात्र काम करत आहेत.

**<><><><><>**

विम्बल्डन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीत गतविजेत्या स्पेनच्या कार्लोस अल्कराझनं इटलीच्या फॅबिओ फॉगनिनीचा ३-२ असा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. उद्या त्याचा सामना ब्रिटनच्या ऑलिव्हर टार्वेट बरोबर होणार आहे. महिला एकेरीच्या लढतीची सुरुवात आज अमेरिकेच्या कोको गौफ्फ आणि युक्रेनच्या डायना यास्ट्रेमस्का यांच्यातल्या सामान्यानं होणार आहे.

**//<><><><><>//**